# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 08 August 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०८ ऑगस्ट २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- महाराष्ट्र लॉजिस्टीक धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजूरी, छत्रपती संभाजीनगर – जालना इथल्या राज्य लॉजिस्टिक हबचा समावेश
- छत्रपती संभाजीनगर इथं मंजूर पाणी पुरवठा प्रकल्पासाठी ८२२ कोटी २३ लाख रुपये कर्ज देण्यास राज्य मंत्रिमंडळाची मान्यता
- अल्पसंख्यांक संशोधन आणि प्रशिक्षण संस्था – मार्टी स्थापन करण्याचा राज्य सरकारचा निर्णय
- देशाची करप्रणाली प्रगती आणि रोजगारनिर्मितीला चालना देणारी असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं प्रतिपादन, वित्त विधेयक लोकसभेत मंजूर

आणि

- पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत अंतिम लढतीपूर्वी अपात्र ठरल्यानंतर कुस्तीपटू विनेश फोगाटनं केली निवृत्ती जाहीर

****

महाराष्ट्र लॉजिस्टीक धोरण– २०२४ ला राज्य मंत्रिमंडळानं मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल ही बैठक झाली. राज्य आर्थिक सल्लागार परिषदेनं केलेल्या शिफारसीनुसार लॉजिस्टीक धोरण तयार करण्यात आलं असून, यामुळे सुमारे पाच लाख रोजगार उपलब्ध होणार आहे. याअंतर्गत छत्रपती संभाजीनगर – जालना राज्य लॉजिस्टिक हब आणि नांदेड – देगलूर प्रादेशिक लॉजिस्टिक हब उभारण्यात येणार आहे.

लहान शहरांमधल्या पायाभूत सुविधांना वेग देण्यासाठी कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध करून देण्यासही मंत्रिमंडळानं मान्यता दिली. याअंतर्गत केंद्राच्या अमृत–दोन

योजनेत छत्रपती संभाजीनगर इथं मंजूर पाणी पुरवठा प्रकल्पातल्या महानगरपालिकेच्या हिश्श्याच्या ८२२ कोटी २३ लाख रुपये कर्ज देण्यास मंजूरी देण्यात आली.

राज्यात अल्पसंख्यंकांच्या उन्नती करता टार्टी, बार्टी, महाज्योतीच्या धरतीवर मार्टी अर्थात अल्पसंख्यांक संशोधन आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला आहे. या संस्थेसाठी एकूण ११ पदं निर्माण केली जातील, तसंच सहा कोटी २५ लाख रुपये प्रशासनिक खर्चासाठीही मंत्रीमंडळानं मान्यता दिली.

शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन करण्यासाठी महत्वाकांक्षी वैनगंगा – नळगंगा नदीजोड प्रकल्पाला देखील मंत्रिमंडळानं काल मान्यता दिली. यामुळे पावणे चार लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

विविध प्रकल्पांमुळे बेघर झालेल्या प्रकल्प बाधितांना घरं देण्यासाठी विविध नियमांमध्ये बदल करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

****

राज्य परिवहन महामंडळातल्या कामगार संघटनांच्या कृती समितीनं उद्या नऊ ऑगस्ट पासून पुकारलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी काल कृती समितीची बैठक घेतली. समितीच्या मागण्यांच्या अनुषंगाने उच्चाधिकारी समितीने बैठक घेऊन त्याचा अहवाल आठवडाभरात सादर करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. महामंडळाच्या उत्पन्नवाढीसाठी राज्य शासन अजून दोन हजार नविन बस घेण्याबाबत सकारात्मक असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

****

राज्यातल्या जनतेला पिण्यासाठी आणि शेतकऱ्यांना सिंचनासाठी पुरेसं पाणी उपलब्ध होण्यासाठी सध्याच्या जलप्रकल्पांची क्षमतावाढ करणं गरजेचं असल्याचं, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. हिंगोली, बीड, सोलापूर आणि कोल्हापूर या जिल्ह्यांतल्या जलसंपदा विभागाशी संबंधित प्रलंबित योजनांच्या संदर्भात काल झालेल्या बैठकीत ते बोलत होते. नैसर्गिक स्त्रोतांचा वापर करून एका प्रकल्पातलं अतिरिक्त पाणी दुसऱ्या प्रकल्पात नेण्याचं नियोजन करावं, असे निर्देश त्यांनी दिले. या जिल्ह्यांमध्ये आवश्यक त्या ठिकाणी कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचं रूपांतर बॅरेजेसमध्ये करून पाणी साठवण क्षमतेत वाढ करण्याची कार्यवाही गतीनं करण्याची सूचनाही पवार यांनी केली.

****

राज्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे एक कोटी ४० लाख अर्ज प्राप्त झाले असून, त्यातले एक कोटी २५ लाख अर्ज मंजूर करण्यात आल्याची माहिती, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. त्या काल नांदेड इथं बोलत होत्या. अधिकाधिक महिलांना योजनेचा लाभ देण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जात असल्याचं तटकरे यांनी सांगितलं.

**

बीड जिल्ह्यामध्ये आतापर्यंत तीन लाख ५२ हजार ८८० महिलांनी या योजनेमध्ये अर्ज दाखल केले असून, त्यातल्या जवळपास ९४ टक्के अर्जांची छाननी करून मोबाईलद्वारे स्वीकृती संदेश देण्यात आले आहेत. तर, परभणी जिल्ह्यात आतापर्यंत दोन लाख ५७ हजार २३५ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी दोन लाख २६ हजार ९४१ अर्ज पात्र ठरले आहेत.

****

भारतीय रिझर्व्ह बँक –आरबीआयनं, विविध कृषी पूरक व्यवसायांसाठी कमी व्याजदरात अल्पावधीसाठी कर्ज उपलब्ध करून देण्याच्या सूचना बँकांना दिल्या आहेत. यानुसार, शेतकऱ्यांना सात टक्के व्याजदरानं, तीन लाख रुपयांपर्यंतचं कर्ज दिलं जाईल. विहित मुदतीत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याजात अतिरिक्त तीन टक्क्यांची सूट दिली जाणार आहे. हे अल्प मुदतीचं कर्ज मिळवण्यासाठी आधार क्रमांक आवश्यक असल्याचं आरबीआयनं म्हटलं आहे.

****

करासंबंधीचे कायदे आणि प्रक्रियांचं सुलभीकरण करून त्याद्वारे देशाची प्रगती आणि रोजगारनिर्मितीला चालना देण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारचा दृष्टिकोन असल्याची ग्वाही, अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी दिली. लोकसभेत काल अर्थ विधेयक २०२४ वरच्या चर्चेला उत्तर देताना त्या बोलत होत्या. सरकारनं गेल्या दशकात कर रचनेत आमूलाग्र बदल केले असून, करांमध्ये भरमसाठ वाढ न करता यात सुलभीकरण आणल्यानं पारदर्शकता वाढली असल्याचं त्या म्हणाल्या. मध्यमवर्गावरचं कराचं ओझं वाढल्याचे दावे त्यांनी फेटाळून लावले. सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे मध्यमवर्गीयांना दिलासा मिळाला तसंच, छोट्या व्यावसायिकांनाही मोठा फायदा झाल्याचं अर्थमंत्र्यांनी यावेळी नमूद केलं.

दरम्यान, या उत्तरानंतर लोकसभेत वित्त विधेयक आवाजी मतदानानं मंजूर झालं.

****

राज्यसभेच्या नऊ राज्यांमधल्या १२ जागांवर होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी निवडणूक आयोगानं काल अधिसुचना जारी केली. महाराष्ट्रात, खासदार उदयनराजे भोसले आणि पियुष गोयल लोकसभेवर निवडून गेल्यामुळे दोन जागांवर पोटनिवडणूक होणार आहे. या सर्व जागांसाठी या महिन्याच्या १४ तारखेला अधिसूचना जारी केली जाणार आहे. २२ तारखेला अर्जांची छाननी होईल, तर २६ तारखेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. या निवपणुकीसाठी तीन सप्टेंबरला मतदान होणार आहे.

****

कुस्तीपटू विनेश फोगाटनं निवृत्ती जाहीर केली आहे. समाजमाध्यमांवरील संदेशात तिनं आपला निर्णय जाहीर केला. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत काल अंतिम लढतीपूर्वी अपात्र ठरल्यानंतर विनेशनं हा निर्णय घेतला आहे. दरम्यान, अपात्रतेच्या निर्णयाविरोधात तिनं क्रीडा लवादाकडे दाद मागितली आहे. आपल्याला संयुक्त रौप्य पदक मिळावं, अशी मागणी विनेशननं लवादाकडं केली आहे.

दरम्यान, ऑलिम्पिकमध्ये आज भालाफेकपटू नीरज चोप्रा अंतिम फेरीत खेळणार आहे. तर, पुरुष हॉकी संघाची कांस्यपदकासाठी स्पेनविरुद्ध लढत होणार आहे. पुरुष कुस्ती स्पर्धेत अमन शेरावत ५७ किलो वजनीगटात खेळेल तर, महिलांच्या ५७ किलो वजनीगटात अंशू भारताचे प्रतिनिधीत्व करणार आहे. काल झालेल्या भारोत्तोलन स्पर्धेत मीराबाई चानू चौथ्या क्रमांकावर राहिली. तर स्टीपलचेसमध्ये अविनाश साबळे अकराव्या क्रमांकावर राहिला.

****

मराठवाड्यात पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. ठाण्याचे पोलिस उपायुक्त विनयकुमार राठोड हे आता छत्रपती संभाजीनगरचे पोलिस अधीक्षक असतील. पुण्याचे पोलिस उपायुक्त विजय मगर यांची लातूरच्या पोलिस प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्यपदी, अमरावतीचे पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बीडच्या पोलिस अधीक्षक पदी, तर नांदेडचे अपर पोलिस अधीक्षक अविनाशकुमार यांची नांदेडच्या पोलिस अधीक्षकपदी बदली करण्यात आली आहे.

****

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसे शेतकरी संघटनेचे प्रमुख तथा मनसे सरचिटणीस संतोष नागरगोजे यांना विधानसभेची

उमेदवारी जाहीर केली आहे. ठाकरे यांच्या मराठवाडा दौऱ्यात जाहीर झालेली ही पहिलीच उमेदवारी असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. राज ठाकरे काल नांदेडकडे रवाना झाले.

****

पर्यटन विकास प्रक्रियेत स्थानिकांना सहभागी करुन त्यांचं आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी क्षमता बांधणीवर भर द्यावा, असे निर्देश छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत. पर्यटन व्यवस्थापन समितीच्या बैठकीत ते काल बोलत होते. या मुद्यांचा विचार करून, पर्यटन विभागाने आराखडा तयार करावा, असं त्यांनी सांगितलं. स्वदेश दर्शन योजनेअंतर्गत अजिंठा आणि वेरुळ लेणी परिसरात पर्यटन सुविधांचा विकास तसंच अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली.

****

नांदेड जिल्ह्यातल्या, क्षयरोगमुक्त असलेल्या ८६ ग्रामपंचायतींचा काल गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी यावेळी, संपूर्ण जिल्हा क्षयरोगमुक्त करण्याच्या दृष्टीनं जिल्ह्यातल्या आरोग्य संस्थांना मार्गदर्शन केलं.

****

छत्रपती संभाजीनगर शहरातल्या चेलीपुरा भागातल्या अजिंठा दूध डेअरीत विना परवाना दुग्धजन्य पदार्थ निर्मिती होत असल्याचं आढळून आल्यानं डेअरी चालकावर कारवाई करण्यात आली. अस्वच्छ वातावरणात होत असलेल्या निर्मितीसंदर्भात दुग्धजन्य पदार्थांचे नमुनेही घेण्यात आले आहेत. मंगळवारी रात्री केलेल्या या कारवाईत सहा कॅन मध्ये १४९ किलो दही, १९ किलो पनीर, ४९ किलो एसएमपी पावडर जप्त करण्यात आली.

****

सुधारित फौजदारी कायद्यांविषयी माहिती देणाऱ्या मल्टीमिडिया चित्र प्रदर्शनाचं काल नांदेड जिल्हा आणि सत्र न्यायालयात उद्घाटन झालं. कायद्यांची माहिती सोप्या भाषेत देणारं हे प्रदर्शन आज ही सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुलं असणार आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या आठ तालुक्यातल्या सातशे वीस गावात घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनासह स्वच्छतेची विविध कामं पूर्ण झाली आहेत. आता पुढच्या टप्प्यात नियमित जनजागृती करण्यात येणार असून यासाठी दोन ऑक्टोबर रोजी विशेष ग्रामसभांचं आयोजन केलं जाणार आहे.

****